**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्रमांक -ससं/उशि/निवडणूक आचारसंहिता/पुवि/२०२४/ 8102 दि. ०५/११/२०२४

**महत्वाचे / निवडणूक**

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, पुणे विभाग,
३. प्राचार्य / प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित /कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान,
विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे विभाग.**

विषय - **निवडणूक आचारसंहितेचे पालन करणेबाबत..**

संदर्भ - मा. संचालक, उच्च शिक्षण, म.रा. पुणे यांचे परिपत्रक क्र. निवडणूक आचारसंहिता/२०२४/विशि-१/४९२५ दिनांक ५.११.२०२४.

वाचा - १. मा. निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे आचारसंहिता पालनाबाबतचे निर्देश.
२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९.
३. महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाणसंहिता (शिक्षकेत्तर पदांच्या अटी व सेवाशती) नियम १९८४.

उपरोक्त विषय व संदर्भान्वये कळविण्यात येते की, सध्या राज्यामध्ये महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. या आचारसंहितेमध्ये मा. निवडणूक आयोग यांचेकडून आचारसंहिता नियमांचे पालन करण्याबाबतचे मा. संचालनालयाचे परिपत्रक सोबत जोडण्यात आलेले आहे.

सदर परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. तसेच आपल्या विद्यापीठांमध्ये व महाविद्यालयांमध्ये पात्र विद्यार्थी, विद्यार्थीनी यांना मतदान करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहित करण्यात यावे.

(Signed)

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

सोबत - परिपत्रक.
प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,म.रा., पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी,शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक- निवडणूक आचारसंहिता/२०२४/विशि-१/४९२५ दि.५ नोव्हेंबर, २०२४

**परिपत्रक-**

**वाचा** १.मा.निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे आचारसंहिता पालनाबाबतचे निर्देश
२..महाराष्ट्र नागरी सेवा(वर्तणूक) नियम १९७९
३..महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाणसंहिता(शिक्षकेत्तर पदांच्या अटी व सेवाशर्ती) नियम १९८४

सध्या राज्यामध्ये महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. या आचारसंहितेमध्ये मा.निवडणूक आयोग यांचेकडून आचारसंहिता नियमाचे पालन करण्याबाबतचे विविध प्रकारचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

मा.निवडणूक आयोग यांचे आचारसंहिता पालनासंदर्भातील निर्देश, त्याचप्रमाणे शासन निर्णय दि.२० मे, २०१० अन्वये राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी सामाईक परिनियम (Common Statutes) अस्तित्वात येईपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदी लागू करण्यात आलेल्या आहेत. करिता, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ५(१) मध्ये नमूद केल्यानुसार, कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा राजकारणात भाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य होता येणार नाही. किंवा त्याचेशी अन्यथा संबंध ठेवता येणार नाही किंवा कोणत्याही राजकीय चळवळीत किंवा कार्यात कोणत्याही प्रकारे भाग घेता येणार नाही किंवा सहाय्य करता येणार नाही. तसेच ५(४) नुसार तो कर्मचारी कोणत्याही विधानसभेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणूकीत प्रचार करू शकणार नाही किंवा अन्यथा हस्तक्षेप करू शकणार नाही किंवा त्यासंबंधी आपले वजन खर्च करू शकणार नाही किंवा त्यात भाग घेऊ शकणार नाही, याकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

सबब, राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी राजकीय पक्षांच्या निवडणूक प्रचार कामात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभाग घेतल्यास त्यांचेविरूद्ध विद्यापीठे व संबंधित संस्थांनी शिस्तभंगविषयक कठोर कारवाई करावी.

या अनुषंगाने सदर परिपत्रक आपले अधिनस्त सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांचे निदर्शनास आणण्यात यावे.

तसेच मतदानाचा टक्का वाढावा यासाठी आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील पात्र विद्यार्थी, विद्यार्थीनी यांना मतदान करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहित करावे.

(डॉ.शैलेन्द्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक ( उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६.

प्रति,

१.कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे ,
२.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

प्रत- मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२